**आकाशवाणी मुंबई**

**प्रादेशिक बातम्या देत आहे.**

**<u>ठळक बातम्या</u>**

- फ्रान्स दौरा आटोपून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी अमेरिकेला रवाना
- शहीद महेश नागुलवार यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार, कुटुंबीयांना 2 कोटी रुपयांचे आर्थिक सहाय्य देण्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा
- शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेतेपदाचा राजन साळवी यांच्याकडून राजीनामा

**आणि**

- तिसऱ्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात भारताचं इंग्लंडपुढं विजयासाठी ३५७ धावांचं आव्हान

**<><><><><>**

फ्रान्सचा दौरा आटोपून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज अमेरिकेला रवाना झाले. त्यापूर्वी फ्रान्समधे मार्सेली इथं भारताच्या पहिल्या वाणिज्य दूतावासाचं उद्घाटन आज प्रधानमंत्री आणि फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युअल मॅक्राँ यांच्या हस्ते झालं. उभय नेत्यांनी यावेळी फ्रान्समधे राहणाऱ्या भारतीय समुदायाशी संवाद साधला. त्यानंतर मझार्गे युद्धस्मारकावर दुसऱ्या महायुद्धात धारातीर्थी पडलेल्या सतराशे भारतीय सैनिकांना त्यांनी आदरांजली वाहिली. त्यानंतर त्यांनी भारत-फ्रान्स संयुक्त प्रकल्प आंतरराष्ट्रीय प्रायोगिक औष्णिक अणुभट्टीला तसंच मार्सेली बंदराला भेट दिली.

मार्सेली हे फ्रान्समधलं सर्वात मोठं बंदर असून युरोप, आफ्रिका आणि आशिया दरम्यानच्या सागरी व्यापाराचं ते प्रवेशद्वार मानलं जातं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युअल मॅक्राँ यांनी उभय देशांदरम्यानच्या भागीदारीविषयी सविस्तर चर्चा केली. संरक्षण, अणुशक्तीचा शांतिपूर्ण वापर, तसंच अंतराळविज्ञान या विषयांचा त्यात समावेश होता, असं परराष्ट्रव्यवहार मंत्रालयाचे सचिव विक्रम मिसरी यांनी आज पत्रकार परिषदेत सांगितलं. आपसातल्या तंत्रज्ञान, नवोन्मेष आणि स्टार्टअप्सना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीनं पुढचं वर्ष भारत फ्रान्स नवोन्मेष वर्ष म्हणून साजरं करण्यावर दोघांमधे सहमती झाली असल्याचं मिसरी यांनी सांगितलं. युरोप, पश्चिम आशिया आणि हिंद-प्रशांत महासागर क्षेत्रातल्या भूराजकीय घडामोडींविषयी देखील त्यांच्यात चर्चा झाली. मोदी आणि मॅक्राँ एकाच विमानाने मार्सेली इथं गेले, त्या प्रवासातही दोघांमधे बातचीत झाली. कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयावर प्राधान्याने त्यांचं बोलणं झालं.

**<><><><><>**

भामरागड इथल्या जंगलात नक्षल्यांशी लढताना शहीद झालेले पोलीस अंमलदार महेश नागुलवार यांच्या पार्थिवावर आज अनखोडा इथे शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. सकाळी गडचिरोलीच्या पोलीस मुख्यालयाच्या पटांगणावर हवेत बंदुकीच्या फैरी झाडून नागुलवार यांना मानवंदना देण्यात आली. त्यानंतर त्यांचा पार्थिव देह अनखोडा या त्यांच्या गावी रवाना करण्यात आलं. भामरागड तालुक्यातल्या दिरंगी आणि फुलनार गावाजवळ काल ही चकमक झाली होती. त्यांच्या शौर्याची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी

कुटुंबीयांना राज्य सरकारतर्फे 2 कोटी रुपयांचे आर्थिक सहाय्य आणि विविध लाभ देण्याची घोषणा केली.

**<><><><><>**

कर्मवीर भाऊराव पाटील यांचं शिक्षण आणि सामाजिक उन्नतीचं कार्य पुढच्या पिढ्यांसाठी प्रेरणादायी आहे, असं प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केलं. कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाच्या प्रथम दीक्षांत समारंभात ते बोलत होते. यावेळी विद्यापीठाच्या स्नातकांना राज्यपालांच्या हस्ते पदवी प्रदान करण्यात आली.

**<><><><><>**

राज्यातल्या शेतकऱ्यांना अधिक लाभ मिळावा यासाठी राष्ट्रीय कृषी विकास योजनेचा सुधारित प्रस्ताव राज्यानं केंद्राला सादर करावा असे निर्देश केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिले. हा प्रस्ताव केंद्र सरकार त्वरित मंजूर करेल, असं त्यांनी सांगितलं. कृषी विकास योजने अंतर्गत ऊस तोडणी यंत्र अनुदान प्रकल्पाचा आढावा घेण्यासाठी नितीन गडकरी यांच्या अध्यक्षतेखाली आज नवी दिल्लीत बैठक झाली, त्यावेळी ते बोलत होते. या योजने अंतर्गत ९०० ऊस तोडणी यंत्राच्या खरेदीला मान्यता दिली असून २५७ लाभार्थ्यांनी यंत्र खरेदी केले आहेत. या योजने अंतर्गत शेतकऱ्यांना खरेदी किमतीच्या ४० टक्के रक्कम किंवा ३५ लाख रुपये अनुदान दिलं जातं. राज्यातल्या ११६ लाभार्थ्यांना अनुदानाची रक्कम मिळाली आहे, उर्वरित १४१ लाभार्थ्यांना अनुदान द्यावं अशी विनंती राज्याचे कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी केली.

**<><><><><>**

बालकांच्या हक्कांचं संरक्षण आणि सुरक्षित भविष्यासाठी महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाकडून सोमवारपासून बालरक्षा अभियान राबवण्यात येणार आहे, अशी घोषणा बालहक्क संरक्षण आयोगाच्या अध्यक्षा सुशीबेन शहा यांनी आज मंत्रालयात केली. हा उपक्रम फेब्रुवारी आणि मार्च २०२५ या कालावधीत संपूर्ण महाराष्ट्रात राबवण्यात येणार आहे. त्याचबरोबर मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, नागपूर, अकोला, नाशिक, पुणे, छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांमध्ये बालरक्षा अभियान कार्यशाळांचं आयोजन केलं जाईल.

**<><><><><>**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे ज्येष्ठ नेते राजन साळवी यांनी पक्षाच्या उपनेतेपदाचा राजीनामा दिला आहे. रत्नागिरी जिल्ह्यातल्या राजापूर विधानसभा मतदारसंघात झालेल्या पराभवाची नैतिक जबाबदारी स्वीकारून आपण उपनेतेपदाचा राजीनामा देत असल्याचं त्यांनी पत्रात लिहिलं आहे. तसंच, ३५ वर्षं प्रामाणिकपणे पक्षसंघटनेचं काम करत आलो असून, सध्या पक्षांतर्गत राजकीय घडामोडींमुळे पक्षसंघटनाबांधणीच्या कार्याला आपण योग्य न्याय देऊ शकत नसल्याचंही त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

परभणी इथल्या आंबेडकरी कार्यकर्ता सोमनाथ सूर्यवंशी यांच्या पोलीस कोठडीत मृत्यूप्रकरणी दोषी पोलिसांवर गुन्हा दाखल करून त्यांना बडतर्फ करावं अशी मागणी काँग्रेसच्या अनुसूचित जाती विभागाचे अध्यक्ष सिद्धार्थ हत्तीअंबिरे यांनी केली आहे. परभणीत कोम्बिंग ऑपरेशनवेळी आंबेडकरी कार्यकर्त्यांवर नोंदवलेले गुन्हे रद्द करा, सूर्यवंशी आणि विजय वाकोडे यांच्या कुटुंबांना प्रत्येकी एक कोटी रुपयांची भरपाई द्या अशी मागणीही हत्तीअंबिरे यांनी केली आहे.

<><><><><>

भारतीय रिझर्व बँक लौकरच ५० रुपये मूल्याच्या नवीन नोटा जारी करणार आहे. या नोटांवर नवनियुक्त गव्हर्नर संजय मल्होत्रा यांची सही असेल. महात्मा गांधी मालिकेतल्या यापूर्वीच्या नोटांप्रमाणेच  या नोटा असतील असं रिझर्व बँकेच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे.

<><><><><>

इंग्लंडविरुद्धच्या एकदिवसीय क्रिकेट मालिकेत, आज अहमदाबाद इथं सुरू असलेल्या तिसऱ्या आणि अंतिम सामन्यात भारतानं इंग्लंडपुढं विजयासाठी ३५७ धावांचं आव्हान ठेवलं आहे. आधीचे दोन सामने जिंकून भारतानं यापूर्वीच मालिका जिंकली आहे. इंग्लंडनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला. सलामीला आलेला भारताचा कर्णधार रोहित शर्मा फक्त १ धाव काढून बाद झाला. मात्र त्यानंतर शुभमन गिल आणि विराट कोहलीनं डाव सावराला. या दोघांनी दुसऱ्या गड्यासाठी ११६ धावांची भागिदारी केली. शुभमन गिलनं शतक झळकावत ११२ केल्या. त्याच्या या खेळीत १४ चौकार आणि तीन षटकारांचा समावेश होता. श्रेयस अय्यरनं ७८, विराट कोहली ५२, तर के एल राहुलनं ४० केल्या. भारतानं निर्धारित ५० षटकात सर्व गडी गमावून ३५६ धावा केल्या. इंग्लंडतर्फे आदिल रशीदनं ४ गडी बाद केले. शेवटची बातमी हाती आली तेव्हा इंग्लंडच्या १७ षटकात २ बाद १२४ धावा झाल्य़ा होत्या.

<><><><><>

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या उपांत्य फेरीच्या पहिल्या सामन्यात गुजरात आणि केरळ, तर दुसऱ्या सामन्यात विदर्भ आणि मुंबई हे संघ

एकमेकांविरुद्ध मैदानात उतरतील. हे दोन्ही सामने १७ फेब्रुवारीपासून सुरू होणार आहेत. तर स्पर्धेतला अंतिम सामना २६ फेब्रुवारीपासून होईल.

**<><><><><>**

टाटा स्मारक केंद्र आणि नॅशनल इन्स्टिटट्यूट ऑफ बायोमेडिकल जीनोमिक्स यांनी, स्तनाच्या कर्करोगाच्या काही रुग्णांकडून हार्मोन उपचारांना प्रतिसाद न मिळण्यामागची जनुकीय कारणं शोधून काढली आहेत. या शोधामुळे अशा रुग्णांसाठीची उपचार योजना ठरवण्यात मदत मिळणार आहे. या शोधात, हार्मोन उपचारांना प्रतिसाद देणाऱ्या आणि प्रतिसाद न देणाऱ्या रुग्णांच्या जीनोमचा तुलनात्मक अभ्यास केल्यानंतर ट्यूमरमधल्या तीन प्रमुख जनुकांमध्ये उत्परिवर्तन आढळलं. हा शोध म्हणजे कर्करोगाच्या वैयक्तिकृत उपचारांमधलं एक महत्त्वाचं मार्गदर्शक पाऊल आहे, असं प्रमुख संशोधक डॉ. निधान बिस्वास यांनी सांगितलं आहे.

**//<><><><><>//**